मुंबई ग्राम पंचायत (सभा) नियम (दुरुस्ती) १९६९.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक-व्हीपीएम्-१५७०-२०५५८-ई,
सचिवालय, मुंबई-३२, दिनांक २६ जून १९७०.

प रि प त्र क

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक-व्हीपीए-११६८-१४८९२-न, दिनांक ७ मे १९६९ अन्वयें मुंबई ग्राम पंचायत (सभा) नियम दुरुस्त करण्यांत आले आहेत. इतर गोष्टीबरोबर दुरुस्त नियम ६(१) मध्यें अशी तरतूद करण्यांत आली आहे की वर उल्लेखिलेल्या ज्या दिवशी नोटीस लावण्यात येईल त्यानंतर लगेच येणाऱ्या दिवसाहून उशीरा नसेल अशा दिवशी त्या गावामध्यें, व एकापेक्षां अधिक गांवे असल्यास; त्या प्रत्येक गांवामध्यें, प्रत्येक सभेच्या तारखेसंबंधीची घोषणा दवंडी पिटवूनसुध्दां करण्यांत येईल.

कृ.मा.प.

शामुमु-रोटा-एच्-४०२(५९९+१-७-७०)

२. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील तरतूद ग्राम पंचायतीचे सरपंच व सेक्रेटरी, यांच्या नजरेस आणावी व त्यांचे निश्चित पालन करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

35

द. वि. साऊरकर,

अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

ग्राम विकास विभाग.

प्रति-

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व उपनगर यांचे जिल्हाधिकारी वगळून),

सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी.

.....

OFFICE OF THE COLLECTOR,
RATNAGIRI.
Date 11 JUL 1970
Branch

1125

O.N
K.W.C.V.

For Collr. R'giri